**वाचले :-**

१) शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.२ डिसेंबर १९९७.
२) आदेश क्रमांक साप्रवि/३/कावि/२८६/२०२४, दि.२३/०१/२०२४
३) मा.क्षेत्रीय अधिकारी,अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. अक्षेका/पापु/१/कावि/२४५/२०२४,दि.१५/१०/२०२४
४) मा.शहर अभियंता बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडील पत्र क्र.बीपी/१/कावि/१२१४/२०२४ दि.२८/१०/२०२४
५) मा.सह शहर अभियंता, झोपडपट्टी निर्मूलन व पुर्नवसन स्थापत्य विभागाकडील पत्र क्र. झोनिपु/स्था/१०/कावि/६१६/२०२४ दि.२३/१०/२०२४
६) श्री.राठोड राम शेटू, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, यांचा दि.१८/०९/२०२४ रोजीचा विनंती अर्ज
७)श्री.पाटील संदीप दिलीपराव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचा दि.२३/१०/२०२४ रोजीचा विनंती अर्ज
८)श्री.टिकार शिरीष विनोद, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचा दि.२२/०७/२०२४ रोजीचा विनंती अर्ज
९) मा.आयुक्त यांचेकडील दिनांक ०६/१२/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/१७३/२०२४
दिनांक ०६/१२/२०२४

**विषय :- स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाचा राजीनामा मंजूर करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर जाहिरात क्र. १८४/२०२२ अन्वये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या अभिनामाची रिक्त पदे सरळसेवेने भरणेत आली होती. कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर पे लेवल एस-६ वेतनश्रेणी र.रु. १९९००-६३२०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेकामी उपरोक्त वाचले क्र. २ अन्वये आदेश निर्गत करणेत आला आहे. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावरील काही उमेदवारांनी राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. या उमेदवारांचा मनपा सेवेतील रुजू दिनांक, राजीनामा देण्याचे कारण, मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव, पदनाम | मनपा सेवेत रुजू दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा अर्ज दिनांक | मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. | मनपा सेवेचा राजीनामा देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.राठोड राम शेटू | ०८/०२/२०२४ | १८/०९/२०२४ | C/१४६६ दि.१८/०९/२०२४ अन्वये र.रू. ५६,२००/- | जिल्हा परिषद, सातारा येथे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर निवड |
| २ | श्री.पाटील संदीप दिलीपराव | २९/०१/२०२४ | २३/१०/२०२४ | C/१७९४ दि.२३/१०/२०२४ अन्वये र.रू.१९,९००/- | महाराष्ट्र शासन नगर परिषद अभियांत्रिकी सेवा गट-क, येथे स्थापत्य अभियंता या पदावर निवड |
| ३ | श्री.टिकार शिरीष विनोद | २६/०२/२०२४ | २२/०७/२०२४ | C/८७९ दि.२२/०७/२०२४ अन्वये र.रू.१९,९००/- | जिल्हा परिषद, अमरावती येथे कनिष्ठ अभियंता या पदावर निवड |

उपरोक्त कर्मचा-यांनी स्तंभ क्र. ६ मधील पदांवर निवड झाल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. उपरोक्त नमूद कर्मचा-यांकडून महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज येणे बाकी नाही व सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसून त्यांचा राजीनामा मंजूरीबाबत संबंधित विभागप्रमुखांनी स्पष्टपणे शिफारस केली आहे. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावरील कर्मचा-यांनी मनपा सेवेचा राजीनामा देणेकामी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार मनपा कोषागारात मुळ वेतन भरल्याची पावती सादर केली आहे.

सबब, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. २ डिसेंबर १९९७ मधील तरतुदी, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व कर्मचा-यांनी केलेला विनंती अर्ज विचारात घेता मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रस्तुतच्या आदेशान्वये उपरोक्त स्तंभ क्र. २ मधील कर्मचा-यांचा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, पदाचा मनपा सेवेचा राजीनामा स्तंभ क्र. ४ मधील दिनांकापासून मंजूर करण्यास मान्यता देत आहे. तसेच स्तंभ क्र. ४ मधील

दिनांकापासून ते आदेशाचे तारखेपर्यंतचा कालावधी विनावेतनी करण्यात यावा. त्याचप्रमाणे लेखापरिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती संबंधित कर्मचा-यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबधित कर्मचा-यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति -
श्री.राठोड राम शेट्टू, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक
श्री.पाटील संदीप दिलीपराव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक
श्री.टिकार शिरीष विनोद, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक

प्रत -
१. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३. दूरसंचार ४. माहिती व जनसंपर्क विभाग
५.कामगार कल्याण विभाग ६.साप्रवि टेबल क्र. ७,८,१०,११,१२,१४, संग.कक्ष (साप्रवि)
७.बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग
८.झोनिपु विभाग ९.अ क्षेत्रीय कार्यालय १०.सर्व संबंधित विभाग ११.माहिती तंत्रज्ञान विभाग

उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८